पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.स्थायी समिति
**कार्यपत्रिका क्रमांक – १८२**
(सभावृत्तांत)

**दिनांक – २९/०७/२०२०** **वेळ – दु. ०२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार दिनांक **२९/०७/२०२०** रोजी दु.**०२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सदर सभेत सन्मा. सदस्य आणि संबंधित अधिकारी व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

१. **मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे – सभापती**

या शिवाय मा.पवार – अति.आयुक्त (२), मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.सुभाष इंगळे – उप आयुक्त, मा.डॉ.रॉय – आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.चितळे – सहाय्यक आयुक्त, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठता YCMH,मा.खाबडे, मा.गट्टुवार – कार्यकारी अभियंता, मा.दांगट – प्रशासन अधिकारी, मा.जरांडे – सुरक्षा अधिकारीहे अधिकारी उपस्थित होते.

----------

**मा.सभापती** – सभा कामकाज सुरु करतेवेळी आवश्यक गणसंख्या सभागृहात उपस्थित नसलेने सदरची सभा बुधवार दिनांक ०५/०८/२०२० रोजी दुपारी २.१५ वाजेपर्यंत तहकूब करणेत येत आहे.

**(संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १८२**

(सभावृत्तांत)

( दिनांक २९/०७/२०२० दु.२.३० वा. ची तहकूब सभा )

**दिनांक – ०५/०८/२०२०** **वेळ – दु. ०२.१५ वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दि.२९/०७/२०२० दु.२.३० वा. ची **तहकूब** सभा **बुधवार दि.०५/०८/२०२०** रोजी दु.**०२.१५** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सदर सभेत सन्मा.सदस्य आणि संबंधित अधिकारी व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

**१. मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे – सभापती**
२. मा.चौंधे आरती सुरेश
३. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
४. मा.लांडगे राजेंद्र किसनराव
५. मा.पंकज दत्तात्रय भालेकर
६. मा.कलाटे राहुल तानाजी
७. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
८. मा.कदम शशिकांत गणपत
९. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
१०. मा.संतोष बबन कांबळे
११. मा.अभिषेक गोविंद बारणे
१२. मा.फुगे भिमाबाई पोपट
१३. मा.सुलक्षणा राजू धर

या शिवाय मा.श्रावण हर्डीकर – आयुक्त, मा.पाटील - अति.आयुक्त(१), मा.पवार – अति.आयुक्त(२), मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.सुभाष इंगळे – उप आयुक्त, मा.डॉ.रॉय – आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठाता YCMH, हे अधिकारी सभागृहात उपस्थित राहून तसेच मा.कोळंबे – मुख्य लेखा व वित्त अधिकारी , मा.पाटील – शहर अभियंता, मा.तांबे - सह शहर अभियंता, मा.जोशी, मा.दुरगुडे, मा.लोणकर, - सहाय्यक आयुक्त, मा.जरांडे – सुरक्षा अधिकारी हे अधिकारी व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

----------

**खालीलप्रमाणेसुचनामांडणेतआली.**

सुचक – मा.राजेंद्र लांडगे                                   अनुमोदक – मा.पंकज भालेकर

विद्यमान नगरसदस्य जावेद शेख, माजी मुख्यमंत्री शिवाजीराव निलंगेकर (पाटील), मध्य प्रदेश राज्यपाल लालजी टंडन, माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी यांची पत्नी अनघा जोशी, आरोग्य मंत्री राजेश टोपे यांचे मातोश्री शारदाताई टोपे, माजी राज्यमंत्री अनिल राठोड, समाजवादी पार्टीचे माजी खाजदार अमरसिंह, माजी नगरसेवक संजय साळवे, एकनाथ थोरात, सुलोचना बढे, लक्ष्मण गायकवाड यांचे नुकतेच दु:खद निधन झाले आहे. आजच्या सभेत त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेत येवून बुधवार दि.०५/०८/२०२० ची मा.स्थायी समितीची सभा बुधवार दि.१२/०८/२०२० रोजी दु.०२.०० वा. पर्यंत तहकुब करणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

----------

**सभापती -** बुधवार दि.०५/०८/२०२० ची मा.स्थायी समितीची सभाबुधवार दि.१२/०८/२०२० रोजी दु.०२.०० वा. पर्यंत तहकुब करणेत येत आहे.

**(संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिति

**कार्यपत्रिका क्रमांक – १८२**

(सभावृत्तांत)

( दिनांक २९/०७/२०२० दु.२.३० वा. व दि.०५/०८/२०२० दु.२.१५ वा. ची तहकूब सभा )

**दिनांक – १२/०८/२०२०** **वेळ – दु.०२.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दि.०५/०८/२०२० दु.२.१५ वा. ची **तहकूब** सभा **बुधवार दि.१२/०८/२०२०** रोजी दु.**०२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सदर सभेत सन्मा.सदस्य आणि संबंधित अधिकारी व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

**१. मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे – सभापती**
२. मा.चोंधे आरती सुरेश
३. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
४. मा.लांडगे राजेंद्र किसनराव
५. मा.पंकज दत्तात्रय भालेकर
६. मा.कलाटे मयूर पांडुरंग
७. मा.कलाटे राहुल तानाजी
८. मा.कदम शशिकांत गणपत
९. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
१०. मा.संतोष बबन कांबळे
११. मा.अभिषेक गोविंद बारणे
१२. मा.बुर्डे सुवर्णा विकास
१३. मा.फुगे भिमाबाई पोपट
१४. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
१५. मा.सुलक्षणा राजू धर

या शिवाय मा.श्रावण हर्डीकर – आयुक्त, मा.पाटील - अति.आयुक्त (१), मा.पवार – अति.आयुक्त (२), मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.डॉ.रॉय – आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.कोळंबे – मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.भालकर – सह शहर अभियंता, मा.चितळे, मा.इंदलकर – सहाय्यक आयुक्त, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठाता YCMH, मा.घोडे, मा.गट्टूवार, मा.पवार – कार्यकारी अभियंता, मा.दांगट – प्रशासन अधिकारी, मा.जरांडे – सुरक्षा अधिकारी, मा.माने – लेखाधिकारी पीएमपीएमएल हे अधिकारी सभागृहात उपस्थित राहून तसेच मा.कुंभोजकर – मुख्य लेखापरिक्षक, मा.राजन पाटील – शहर अभियंता, मा.तांबे - सह शहर अभियंता, मा.जोशी, मा.दुरगुडे, मा.लोणकर, मा.खोत - सहाय्यक आयुक्त,

मा.पोमण–मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.चव्हाण, मा.जुंधारे, मा.देशमुख, मा.धुमाळ, मा.शिंदे, मा.टकले – कार्यकारी अभियंताहे अधिकारी व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

----------

दिनांक २२/०७/२०२० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.१८१) चा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – ७२७१ विषय क्रमांक – १
दिनांक – १२/०८/२०२० विभाग – भूमि आणि जिंदगी
सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.आरती चोंधे
संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचेकडील पत्र क्र.भूमि/२/कावि/१८१/२०२०, दि.१७/०३/२०२०

विषय – संत तुकारामनगर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुल प्रेक्षकगॅलरी खालील जागेवरील गाळयांबाबत..

सदरचा विषय दप्तरी दाखल करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२७२ विषय क्रमांक – २
दिनांक – १२/०८/२०२० विभाग – लेखा
सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.आरती चोंधे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.लेखा/१/कावि/१५०/२०२०, दि.१६/०७/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९४ नुसार महानगरपालिकेचे सन २०१८-१९ या वर्षातील प्रत्यक्ष जमा–खर्चाचे वार्षिक लेखे तयार करण्यातआले आहेत. सदर वार्षिक लेख्यानुसार प्रत्यक्ष जमा खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२७३ विषय क्रमांक – ३
दिनांक – १२/०८/२०२० विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.मभा/१५/कावि/३०८/२०२०, दि.२०/०७/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

भारतीय साथरोग अधिनियम 1897, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005, महानगरपालिका अधिनियम कलम 63(6) व कलम 67(3)(क) नुसार कोरोना विषाणूचा (COVID19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी लॉकडाऊनमुळे राज्यात अडकलेले उत्तरप्रदेश तसेच बिहार व अन्य राज्यातील स्थलांतरीत व्यक्तिंसाठी रेल्वे प्रवासा दरम्यान पाण्याच्या बाटल्या (1 लि. मिनरल वॉटर) तातडीने उपलब्ध करुन देणेकामी

र.रु.17/- (यामध्ये प्रामुख्याने वाहतूक तसेच रेल्वे स्टेशन पुणे येथे किंवा उरुळी कांचन येथे प्रत्येक व्यक्तिला डब्यामध्ये नेऊन देणे + कर) याप्रमाणे एकूण 22,500बाटल्यांसाठी अदा करावयाच्या एकूण रुपये 3,82,500/- (अक्षरी र.रू.तीन लाख ब्याऐंशी हजार पाचशे फक्त) चे खर्चास कार्योत्तर मान्यता व मे.साई सेवा एंटरप्रायजेस यांचेबरोबर कार्योत्तर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२७४ विषय क्रमांक – ४

दिनांक – १२/०८/२०२० विभाग – ह क्षेत्रिय

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता (वि/यां) यांचेकडील पत्र क्र.हक्षेका/वि/कावि/१५९/२०२०,दि.०३/०७/२०२०

मा.सह शहर अभियंता (वि/यां) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे ह क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत वॉर्ड क्र.२० मधील कासारवाडी आरक्षण क्र.१३ येथे खेळाचे मैदान विकसित करणेचे काम अंतिम टप्प्यात आहे. सदर खेळाचे मैदान,मल्टीपर्पज हॉल,बॅडमिंटन हॉल,स्ट्रीट लाईट करिता विजपुरवठा करणे आवश्यक आहे. त्याकरिता इकडील पत्र क्र.हक्षेका/वि/कावि/१८८/२०१९ दि.२२.११.२०१९ अन्वये म.रा.वि.वि.कं.लि.यांना कळविले असता, त्यांचेकडीलकोटेशन क्र.EE/PCD/T/LT/SPL/ADDLOAD/LSO/COMMERCIAL/64/2019-20/710 दि.०६.०३.२०२० अन्वये कोटेशन प्राप्त झाले आहे. त्यामध्ये एकूण र.रु.२,३१,०३८/- रक्कम कळविली आहे. निविदा अट क्र.१७ नुसार सदर र.रु.२,३१,०३८/- पैकी र.रु.३५,२३८/- कामाचे ठेकेदार मे.इलेक्ट्रोमेकॅनिक्स यांनी अदा करणे आवश्यक आहे व मा.आयुक्त यांचे नावे सुरक्षा शुल्क र.रु.१,९५,८००/- मनपाने अदा करणे आवश्यक आहे. सदरील सुरक्षा शुल्क अदा केलेनंतर वीज जोडणी व नवीन वीजमीटर म.रा.वि.वि.कं.लि. यांचे कडुन उपलब्ध होणार आहे. तरी सदर रक्कम म.रा.वि.वि. कंपनीस अदा करणे आवश्यक आहे.तरी कासारवाडी आरक्षण क्र.१३ मध्ये खेळाचे मैदानास विजपुरवठा करणेकामी म.रा.वि.वि.कं.लि.यांना सुरक्षा ठेव म्हणुन र.रु.१,९५,८००/- (अक्षरी र.रु.एक लाख पंच्यान्नव हजार आठशे फक्त) अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२७५ विषय क्रमांक – ५

दिनांक –१२/०८/२०२० विभाग – माहिती व तंत्रज्ञान

सुचक – मा.आरती चोंधे अनुमोदक – मा.शितल शिंदे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.मातंवि/१६/कावि/६४/२०२०, दि.२१/०७/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

महानगरपालिकेच्या विविध ११ कोवीड केअर सेंटर, महानगरपालिकेचे ८ कोवीडरुग्णालये व विविध ठिकाणी घेणेत येत असलेल्या Antigen testचे डेटाएन्ट्रीचे कामकाजाकरीता डेटा एन्ट्री ऑपरेटर यांची आवश्यकता आहे. सदर कामीमनपा मध्ये कोपा-पासा प्रशिक्षण पूर्ण झालेल्या

प्रशिक्षणार्थींची COVID-19बाबतची Data Entryकरणे करिता मानधनावर ऑपरेटर भरणेबाबत नेमणूक करणे आवश्यकआहे. सदर कमाकाजाकरिता प्रति महिना प्रति डेटा एन्ट्री ऑपरेटर र.रू.१९,२५०/- (अक्षरी र.रु. एकोणीस हजार दोनशे पन्नास फक्त) एवढा खर्चअपेक्षित आहे. सदर दर निश्चित करुन उपरोक्त कामकाजासाठी सदर दराने एकूण ४०डेटा ऐंट्री ऑपरेटर आवश्यकतेनुसार उपलब्ध करुन घेणे शक्य आहे. सदर एकूण ४०डेटा ऐंट्री ऑपरेटरसाठी ३ महिने कालावधी करिता एकूण र.रु.२३,१०,०००/- (अक्षरी र.रू.तेवीस लाख दहा हजार फक्त) इतकाखर्च आपेक्षित आहे. सदरचा खर्च माहिती व तंत्रज्ञान विभागाकडील "ई-गव्हर्नन्स" या लेखाशिर्षावरुन करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२७६ विषय क्रमांक – ६

दिनांक – १२/०८/२०२० विभाग – वाय.सी.एम.एच.

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.शितल शिंदे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.वायसीएमएच/७/कावि/४८८/२०२०, दि.१४/०७/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयाकरीता दरमहा एकत्रित मानधनावरतात्पुरत्या स्वरूपात स्टाफनर्स, ब्लॅड बॅक टेक्निशियन, ब्लॅड बॅककौन्सीलर, एम.एस.डब्ल्यु, डायलेसिस टेक्निशियन, डाटाएंट्री ऑपरेटर, फर्मासिस्ट, एक्स-रे टेक्नशियन, लॅब टेक्निशियन, पुरूषकक्ष मदतनीस वस्त्रीकक्ष मदतनीस ही पदे सहा महिने कालावधीकरीता भरणेकामी वर्तमानपत्रात वमनपा वेबसाईटवर जाहिरात प्रकटन क्र.१५२/२०१९ प्रसिध्द करून प्राप्तउमेदवारांच्या लेखीपरिक्षा घेऊन त्यामधुन गुणवत्ता व आरक्षणानुसार निवडझालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश निर्गत करणेत आलेले आहेत. तसेच कोविडकामकाजासाठी नव्याने मंजुर केलेल्या वाढीव ६२ स्टाफनर्स पदांवर गुणवत्तायादीतील उमेदवारांची नियुक्ती करणेत आलेली आहे. परंतु नियुक्ती आदेशातीलविहित मुदतीत रूजू न झालेले व रूजू होऊन मध्येच सेवा सोडून गेलेल्याउमेदवारांच्या रिक्त ५२ जागेकरीता माहे मे व जुन २०२० मध्ये Walk In Interview व्दारे निवड झालेल्या ३५ स्टाफनर्स उमेदवारांची निवड यादीसोबतचे प्रपत्र अ मध्ये सादर केली आहे. त्यास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२७७ विषय क्रमांक – ७

दिनांक – १२/०८/२०२० विभाग – वाय.सी.एम.एच.

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.वायसीएमएच/७/कावि/३७५/२०२०, दि.२५/०६/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयाकरीता दरमहा एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात स्टाफनर्स पदे भरणेकामी वर्तमानपत्रात व मनपा वेबसाईटवर जाहिरात

क्र.१५२/२०१९ प्रसिध्द करून प्राप्त उमेदवारांच्या लेखीपरिक्षा घेऊन त्यामधुन गुणवत्ता व आरक्षणानुसार निवड झालेल्या ५७ उमेदवारांची निवड यादी सोबतचे पप्रत्र अ मध्ये सादर केली आहे. त्यास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२७८ विषय क्रमांक – ८

दिनांक – १२/०८/२०२० विभाग – वाय.सी.एम.एच.

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.वायसीएमएच/७/कावि/२६८/२०२०, दि.१८/०६/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयाकरीता यापुर्वी दरमहा एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्निशियन, पुरूषकक्ष मदतनीस व स्त्रीकक्ष मदतनीस पदे सहा महिने कालावधीकरीता भरणेकामी वर्तमानपत्रात व मनपा वेबसाईटवर जाहिरात क्र.१५२/२०१९ प्रसिध्द करून प्राप्त उमेदवारांच्या लेखीपरिक्षा घेऊन त्यामधुन गुणवत्ता व आरक्षणानुसार तयार करणेत आलेल्या निवडयादी मधून कोविड-१९ आरटी-पीसीआर लॅबमध्ये तपासणीकामी २२ लॅब टेक्निशियन  व १० कक्ष मदतनीस उमेदवारांची निवडयादी सोबतचे पप्रत्र अ मध्ये सादर केली आहे. त्यास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२७९ विषय क्रमांक – ९

दिनांक – १२/०८/२०२० विभाग – वाय.सी.एम.एच.

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.वायसीएमएच/७/कावि/२६०/२०२०, दि.१०/०६/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयाकरीता अस्थायी स्वरूपातील वरिष्ठ निवासी, कनिष्ठ निवासी, वैद्यकिय अधिकारी सी.एम.ओ, शिफ्ट ड्युटी व आय.सी.यु एम.ओ डॉक्टरांच्या रिक्त पदांकरीता दि.०७/०४/२०२० व दि.१३/०४/२०२० रोजीचे Walk In Interviewकरीता उपस्थीत उमेदवारांमधुन १ वरिष्ठ निवासी, १ कनिष्ठ निवासी व १ आय.सी.यु एम.ओ उमेदवारांची  निवड करणेस शिफारस केलेली आहे. त्यानुसार  सोबतचे प्रपत्र अ मध्ये नमुद केलेल्या १ वरिष्ठ निवासी,१ कनिष्ठ निवासी व १ आय.सी.यु एम.ओ उमेदवारांची दरमहा एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात  आदेशाचे तारखेपासून नियुक्ती करणेस कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२८० विषय क्रमांक – १०

दिनांक – १२/०८/२०२० विभाग – वाय.सी.एम.एच.

सुचक – मा.आरती चोंधे अनुमोदक – मा.अरविंद कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.वायसीएमएच/७/कावि/४९६/२०२०, दि.१६/०७/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयाकरीता दरमहा एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात स्टाफनर्स, ब्लॅडबॅक टेक्निशियन, ब्लॅडबॅक कौन्सीलर, एम.एस. डब्ल्यु, डायलेसिस टेक्निशियन, डाटाएंट्री ऑपरेटर, फर्मासिस्ट, एक्स-रे टेक्नशियन, लॅब टेक्निशियन, पुरूष कक्ष मदतनीस व स्त्रीकक्ष मदतनीस ही पदे सहा महिने कालावधीकरीता भरणेकामी वर्तमानपत्रात व मनपा वेबसाईटवर जाहिरात प्रकटन क्र.१५२/२०१९ प्रसिध्द करून प्राप्त उमेदवारांच्या लेखीपरिक्षा घेऊन त्यामधुन गुणवत्ता व आरक्षणानुसार निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश निर्गत करणेत आलेले आहेत. तसेच कोविड कामकाजासाठी नव्याने मंजुर केलेल्या वाढीव ६२ स्टाफनर्स पदांवर गुणवत्ता यादीतील उमेदवारांची नियुक्ती करणेत आलेली आहे. परंतु नियुक्ती आदेशातील विहित मुदतीत रूजू न झालेले व रूजू होऊन मध्येच सेवा सोडून गेलेल्या उमेदवारांच्या रिक्त ३८ जागेकरीता माहे १५ जुलै २०२० अखेर Walk In Interview व्दारे निवड झालेल्या १६ स्टाफनर्स उमेदवारांची निवडयादी सोबतचे प्रपत्र अ मध्ये सादर केली आहे. त्यास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२८१ विषय क्रमांक – ११

दिनांक – १२/०८/२०२० विभाग – वाय.सी.एम.एच.

सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.वायसीएमएच/७/कावि/१९८/२०२०, दि.०९/०३/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयामध्ये रूग्णाचा वाढता व्याप विचारात घेता सध्या आवश्यक असलेली अस्थायी स्वरूपातील दंतरोग विभागासाठी २ कनिष्ठ निवासी पदे एकत्रित मानधनावर तात्पुरत्या/ हंगामी स्वरूपात सहा महिनकरीता भरणेकामी वृत्तपत्रात व मनपा संकेतस्थळावर जाहिरात क्र.२६५ दि.०१/०२/२०२० चे प्रकटन प्रसिध्द करून अर्ज मागविणेत आलेले आहेत. त्याअनुषंगाने दंतरोग विभागाकरीता २ पदासाठी आलेल्या ५६ उमेदवारांची लेखीपरिक्षा घेणे आवश्यक असल्याने दिनांक १५/०२/२०२० रोजी लेखीपरिक्षा घेणेत आलेली आहे. लेखीपरिक्षेच्या निकालानुसार गुणावत्ता यादी तयार करून त्यामधुन दंतरोग विभासाठी २ कनिष्ठ निवासी उमेदवारांची गुणवत्तेवर व आरक्षणानुसार निवड करून रूग्णालयीन कामाची निकड लक्षात घेता निवड झालेल्या खालील २ कनिष्ठ निवासी उमेदवारांना प्रथम आदेश क्र.वायसीएमएच/७/कावि/१९७/२०२० दि.०६/०३/२०२० अन्वये आदेशाचे दिनांकापासून पुढे सहा महिनेकरीता तात्पुरत्या स्वरूपात नेमणुक देण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | उमेदवारांचे नाव | प्रवर्ग | निवड प्रवर्ग | नियुक्ती पद व विभाग | मानधन प्रती महा र.रू. |
|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ.निखिल रोशनलाल अगरवाल | खुला | खुला | कनिष्ठ निवासी दंतरोग | ५५०००/- |
| २ | डॉ. शिवाजी राघू चव्हाण | व्ही.जे.ए | व्ही.जे.ए | कनिष्ठ निवासी दंतरोग | ५५०००/- |

यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयाचे दंतरोग विभागासाठी अस्थायी स्वरूपात मंजुर असलेल्या २ कनिष्ठ निवासी पदासाठी उक्त जाहिरातीनुसार आलेल्या ५६ उमेदवारांची लेखीपरिक्षा घेणेत आलेली आसून त्यांची गुणवत्तायादी दक्षता विभागाकडून प्राप्त झालेली आहे. प्राप्त निकालाचे अवलोकन करून गुणानुक्रमे निवड झालेल्या २ उमेदवारांना प्रती महा देणेत येणारे एकत्रित मानधन त्यांच्या नावापुढे दर्शविणेत आलेले असून त्यांना आदेशाच्या तारखेपासून पुढे सहा महिने कालावधीसाठी तात्पुरत्या/हंगामी स्वरूपात एकत्रित मानधनावर नेमणुक देणेत आलेली आहे. सदर उमेदवारांना प्रती महा देणेत येणा-या एकत्रित सुधारीत मानधन खर्चास मान्यता मिळणेकामी व उक्त नेमणुक आदेशान्वये नियुक्ती केलेल्या २ उमेदवारामधुन जे उमेदवार विहित मुदतीत कामावर रूजू होणार नाही किंवा रूजू झालेले उमेदवार मुदतीपुर्वी सोडून गेल्यास अशा रिक्त होणा-या जागी पुढील सहा महिन्यात Walk In Interviewने नविन उमेदवरांची नेमणुक करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२८२ विषय क्रमांक – १२

दिनांक – १२/०८/२०२० विभाग – वाय.सी.एम.एच.

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.वायसीएमएच/७/कावि/५०४/२०२०, दि.२०/०७/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून –

यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयात तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर भरणेत आलेल्या व सध्या कार्यरत असलेल्या वरिष्ठ निवासी, कनिष्ठ निवासी, पी.जी.जी.आर व पुढील कालावधीत आवश्यकतेनुसार भरणेत येणा-या विविध कंन्सलटंट पदांना कोविड-१९ चे कामकाजाकरीता कोविड कालावधीपुरता दरमहा र.रू.१०,०००/- इतके मानधन अदा करणेबाबत धोरण निश्चीत करणेत येत आहे. तरी यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयाकरीता अस्थायी स्वरूपात नियुक्ती दिलेल्या व यापुढील कालावधीत नेमावयाच्या खालील तक्त्यातील विविध डॉक्टर पदांना कोविड कालावधीपुरता अदा करावयाचे मानधनासह सविस्तर तपशील खालील प्रमाणे नमुद केला आहे.

| **अ.क्र.** | **पदनाम** | **शैक्षणिक अर्हता** | **सध्या देय मानधन दरमहा र.रूपये** | **कोविड-१९ कालावधीकरीता द्यावयाची वाट** | **कोविड कालावधीकरीता द्यावयाचे मानधन** |
|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** |
| १ | वरिष्ठ निवासी | एम.डी/एस.एस-एम.एम.सी.रजि.अद्या,<br>डिप्लोमा- एम.एम.सी रजि.अद्यावत | ६५०००/-<br>६००००/- | १००००/-<br>१००००/- | ७५०००/-<br>७००००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | कनिष्ठ निवासी | एम.डी/एस.एस/डिप्लोमा,एम.एम.रजि.<br>एम.बी.बी.एस- एम.एम.सी रजि.अद्या. | ६००००/-<br>५५०००/- | १००००/-<br>१००००/- | ७००००/-<br>६५०००/- |
| ३ | कनिष्ठ निवासी (दंत) | बी.डी.एस-एम.एस.डी.सी रजि.अद्यावत | ५५०००/- | १००००/- | ६५०००/- |
| ४ | पॅथालॉजीस्ट | एम.डी (पॅथ) एम.एम.सी रजि.अद्या.<br>डिप्लोमा (DPB)एम.एम.सी रजि.अद्या. | ६५०००/-<br>६००००/- | १००००/-<br>१००००/- | ७५०००/<br>७००००/- |
| ५ | रेडिओलॉजीस्ट | एम.डी (Radio) एम.एम.सी रजि. अद्या. डिप्लोमा (DMRD)एम.एम.सी रजि.अद्या | ७५०००/-<br>६५०००/- | १००००/-<br>१००००/- | ८५०००/-<br>७५०००/- |
| ६ | सर्जन | एम.एस (जनरल) एम.एम.सी रजि.<br>डिप्लोमा(DNB)(जन)एम.एम.सीरजि. अद्या | ६५०००/-<br>६००००/- | १००००/-<br>१००००/- | ७५०००/-<br>७००००/- |
| ७ | कॅन्सर सर्जन | एम.सी.एच (कॅन्सर)किंवा Fellow Ship In Oncology After MS<br>MS/DNBव ५ वर्षाचा अनुभव. एम.एम.सी रजि.अद्यावत | ७००००/-<br>६५०००/- | १००००/-<br>१००००/- | ८००००/<br>७५०००/- |
| ८ | न्युरो सर्जन | MCH/DNB(न्युरो),एम.एम.सीरजि. अद्या. | ७००००/- | १००००/- | ८००००/- |
| ९ | बालरोग सर्जन | MCH/DNB(paed Surgery) एम.एम.सी रजि.अद्या. | ७००००/- | १००००/- | ८००००/- |
| १० | न्युरो फिजिशियन | सुपर स्पेशालिटीDM (Neuro) एम.एम.सी रजि.अद्यावत | ७००००/- | १००००/- | ८००००/- |
| ११ | फिजिशियन | MD/DNB (MED) एम.एम.सी रजि.अद्या | ६५०००/- | १००००/- | ७५०००/- |
| १२ | आस्थीरोग तज्ञ | MS/DNB (ORTHO)एम.एस.सी रजि.<br>DIPLOMA(ORTHO)एम.एम.सीरजि.अ | ६५०००/-<br>६००००/- | १००००/-<br>१००००/- | ७५०००/-<br>७००००/- |
| १३ | उरोरोग तज्ञ | MD/DNB(Chest) एम.एम.सी रजि.अद्या<br>DTCD, एम.एम.सी रजि. अद्यावत | ६५०००/-<br>६००००/- | १००००/-<br>१००००/- | ७५०००/<br>७००००/- |
| १४ | त्वचा व गुप्तरोग तज्ञ | MD/DNB/DDV(SKIN)एम.एम.सी अद्यावत | ६५०००/- | १००००/- | ७५०००/- |
| १५ | पी.जी जी. आर | एम.बी.बी.एस एम.एम.सी रजि.अद्या. | ५५०००/- | १००००/- | ६५०००/- |

मनपाचे यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयाकरीता तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर नेमणुक करणेत आलेल्या व सध्या कार्यरत असलेल्या वरिष्ठ निवासी, कनिष्ठ निवासी,पी.जीजी.आर पदांना व यापुढे आवश्यकतेनुसार मानधनावर भरणेत येणा-या विविध कंन्सलटंट पदांना कोविड कालावधीकरीता र.रू.१०,०००/- या प्रमाणे दरमहा द्यावयाची मानधनवाढ रकाना क्र.५ मध्ये नमुद केलेली आहे. सदर मानधनावाढ अदा करणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी दिनांक २७/०७/२०२० रोजी यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात मा.महापौर यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सदरचा विषय मंजूर करतांना त्याचा प्रत्यक्ष फायदा माहे एप्रिल २०२० पासून मंजूर करणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ७२८३ विषय क्रमांक – १३
दिनांक – १२/०८/२०२० विभाग – माहिती व तंत्रज्ञान
सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.मातंवि/१२/कावि/२३२/२०२०,दि.२२/०७/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

कोव्हीड-१९ कोरोनाचे वॉर रूमचे कामकाजासाठी मे.भारत संचार निगम लि.यांचेकडून ३०० एम.बी.पी.एस.बँण्ड विड्थ तीन महिने कालावधी करीता उपलब्धकरून देणेचे कामास मुदतवाढ देणेकामी येणारा खर्च र.रू.४,८३,१४४/- (अक्षरी र.रू.चार लाख त्र्याऐंशी हजार एकशे चव्वेचाळीस फक्त) अधिकजी.एस.टी. सह कामकाजास मुदतवाढ देणेस आदेश देण्यात आलेले असल्याने त्याचेअवलोकन करणे व तसेच कोवीड-१९ संपेपर्यत पुढील प्रत्येक तिमाहीसाठी येणा-याप्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२८४ विषय क्रमांक – १४
दिनांक – १२/०८/२०२० विभाग – स्थापत्य ड मुख्यालय
सुचक – मा.सुवर्णा बुर्डे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/नि/ड-मुख्य/१३३/२०२०,दि.२३/०७/२०२०

विषय - प्रभाग क्र.२५ ताथवडे येथील जीवननगर कडुन मुंबई-बेंग्लोर कडे जाणारा २४.०० मी. रुंद डी.पी.रस्ता विकसीत करणे.

विषय क्रमांक १४ चा विचार दिनांक २६/०८/२०२० चे सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२८५ विषय क्रमांक – १५
दिनांक – १२/०८/२०२० विभाग – स्थापत्य ड मुख्यालय
सुचक – मा.राहुल कलाटे अनुमोदक – मा.शितल शिंदे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/नि/ड-मुख्य/१३४/२०२०,दि.२३/०७/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.CIVIL/HO/85/03/2019-20 अन्वयेप्रभाग क्र.२५ वाकड येथे आरक्षण क्र.४/२३ मध्ये शाळा इमारत बांधणेकामीमे.बी के खोसे नि.र.रू.23,67,73,913/- (अक्षरी र.रु.तेवीस कोटी सदुसष्ट लाख त्र्याहत्तर हजार नऊशे तेरा फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयलटेस्टींग चार्जेस वगळून र.रु.23,65,35,913/- वर निविदा दर मागविणेत आलेआहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.23,65,35,913/- पेक्षा 16.22% कमी म्हणजेच र.रु.19,81,69,788/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.15,02,727/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.2,38,000/- = एकुण र.रु.19,99,10,515/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदाअटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच

निविदा अटींनुसारभाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्याबेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कमअदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामाकरुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२८६ विषय क्रमांक – १६

दिनांक – १२/०८/२०२० विभाग – स्थापत्य ड मुख्यालय

सुचक – मा.राहुल कलाटे अनुमोदक – मा.शितल शिंदे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/नि/ड-मुख्य/११९/२०२०, दि.०९/०७/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.CIVIL/HO/85/01/2019-20 अन्वयेप्रभाग क्र.२५ ताथवडे येथील शनीमंदीराकडुन मारुंजे गावाकडे जाणारा ३०.००मी. रुंद डी.पी. रस्ता विकसीत करणेकामी मे.बी.के.खोसे नि.र.रू.24,34,13,558/- (अक्षरी र.रु.चोवीस कोटी चौतीस लाख तेरा हजार पाचशेअठ्ठावन्न फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.24,31,51,174/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर कामउपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.24,31,51,174/- पेक्षा 17.12% कमी म्हणजेचर.रु.20,15,23,693/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.29,04,760/- मटेरियलटेस्टींग चार्जेस र.रु.2,31,850/- = एकुण र.रु.20,46,60,303/- पर्यंतकाम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरीलवस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राटकालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारकराहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यतादेणेत येत आहे.

अनुकुल – ०८ प्रतिकुल - ०५

सदर ठराव बहुमताने मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२८७ विषय क्रमांक – १७

दिनांक – १२/०८/२०२० विभाग – माहिती व तंत्रज्ञान

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.मातंवि/११/कावि/९६/२०२०, दि.१८/०७/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

भारतीय साथरोग अधिनयम १८९७, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, महानगरपलिकाअधिनियम कलम ६३(३) व कलम ६७(३) नुसार कोरोना विषाणूचा (COVID 19) प्रादुर्भावव प्रसार रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी पिं चि मनपासारथी

हेल्पलाईनचे धर्तीवर २४ X ७ एकुण ३ शिफ्ट मध्ये कोरोना कोविड १९ नेबाधित घरगुती विलगीकरण केलेल्या रुग्णांची माहिती संकलित करणेकामी सारथीहेल्पलाईनचे अंतर्गत खाजगी तत्वावर एकुण १० कॉल ऑपरेटर कर्मचारी उपलब्धकरणे कामी कामकाज आदेश क्र.मातंवि/२/कावि/१२९/२०१९ दि.०९/०९/२०१९ चेआदेशातील मान्य दर प्रती कर्मचारी प्रती महिना र.रु.२३,६८४/- अधिक करया प्रमाणे दहा कर्मचा-यांकरीता प्रति महिना र.रु.२,३६,८४०/- अधिक करनुसार सहा महिने कालावधी करीता र.रु.१४,२१,०४०/- अधिक कर या मंजुरदरांनुसार कामकाज सहा महिने कालावधी करीता अथवा पिंचिमनपा कार्यक्षेत्रातीलकोरोना कोविड – १९ ची साथ अटोक्यात येईपर्यंत यापैकी जे पहिले संपेलतोपर्यंत करणे बाबत कामकाजाचे आदेश क्र.मातवि/११/कावि/९५/२०२० दि.१४ जुलै २०२० अन्वये निर्गत करण्यात करण्यात आलेले असल्याने अवलोकनार्थ व मे.टेक नाईन सर्व्हिसेस यांचे बरोबर कार्योत्तर करारनामा करुन घेणेसमान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२८८ | विषय क्रमांक – १८

दिनांक – १२/०८/२०२० | विभाग – माहिती व तंत्रज्ञान

सुचक – मा.राजेंद्र लांडगे | अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.मातंवि/११/कावि/९९/२०२०, दि.२२/०७/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

भारतीय साथरोग अधिनयम १८९७, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, महानगरपलिकाअधिनियम कलम ६३(३) व कलम ६७(३) नुसार कोरोना विषाणूचा (COVID 19) प्रादुर्भाव व प्रसार रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे. कोरोनाचाप्रादुर्भआव झालेल्या रुग्णांवर प्रत्यक्षपणे उपचार करणारे मनपाचे डॉक्टर, इतर वैद्यकीय कर्मचारीवर्ग १ व २ चे अधिकारी यांचे जीवितास कोविड १९ चाधोका उत्पन्न होण्याची दाट शक्यता आहे. सदर कर्मचा-यांच्या प्रकृतीवरदेखरेख ठेवणेकामी Artificial Intelligenceचा उपयोग करुन डॅशबोर्ड सह रिअलटाइम बॉडी टेम्परेचर मॉनिटरिंग, हृदयाची गती, झोपेची गुणवत्ता यावर सहजरीत्या देखरेख ठेवणेकामी GOQii Technologies Pvt. Ltd. यांनी तयारकेलेला स्मार्ट बँड एकुण ३५० नग मे.GOQii Technologies Pvt. Ltd. यांचेमार्फत थेट पद्धतीने खरेदी करणे, त्यांचेसोबत कामाचा करारनामा करणे वत्यासाठी येणा-या र.रू.१०,५०,०००/- (अक्षरी र.रू.दहा लाख पन्नास हजार फक्त) IDBI बॅकेमार्फत प्राप्त झालेल्या CSR फंडातून खर्च करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच महापालिकेच्या वर्ग १ व २ चे अधिकारी यांचे बरोबरच महापालिकेच्या सर्व नगरसेवकांना स्मार्ट बँड उपलब्ध करुन देणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२८९ विषय क्रमांक – १९

दिनांक – १२/०८/२०२० विभाग – ड क्षेत्रिय, जलनि:सारण

सुचक – मा.सुवर्णा बुर्डे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.डक्षेका/जनि/कावि/७१५/२०२०, दि.२०/०७/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ड क्षेत्रिय कार्यालय हद्दीतील मलनि:सारण नलिका मॅनहोल चेंबर्सची सफाई आधुनिक पध्दतीने करणे (सक्शन, जेटींग सह रिसायकलिंग मशिनच्या सहाय्याने) या कामास मे.मेट्रो वेस्ट हॅन्डलिंग प्रा. लि. यांना मा.स्थायी समिती ठराव क्र.४६७५ दि.२८/०२/२०१९ नुसार करारनामा शर्तीनुसारदि.०४/०७/२०१९ च्या आदेशान्वये कामाचे आदेश देणेत आलेले होते. सदर कामाचीमुदत दिनांक ०३/०७/२०२६ पर्यंत आहे. निविदा अटी व शर्ती (A) क्र.३ नुसार सदरनिविदेतील दर हे निविदा कालावधी पर्यंत कायम राहतील.तसेच अट क्र.३२ नुसारत्या कालावधीत भाववाढ फरक देय राहील. सदर निविदेचा कार्य कालावधी ०७ (सात)वर्षे आहे. तथापि कामाचा आदेश व करारनामा हा ०१ (प्रथम) वर्षासाठी करणेतआलेला आहे. त्यानंतर कामाची प्रगती, Performance विचारात घेऊन पुढीलप्रत्येक वर्षासाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेने मुदतवाढ देणेत येईल.तसेच निविदा अटी व शर्तीनुसार भाववाढ फरक देय राहील असे आहे . त्यानुसारठेकेदाराने सदरचे काम प्रथम वर्षात समाधानकारक पूर्ण केलेले आहे. द्वितीयवर्षासाठी (०३.०७.२०२१ पर्यत) मा.स्थायी समितीची मंजुरी प्राप्त करणेआवश्यक आहे. सदर कामासाठी सन २०२०-२१ चे अंदाजपत्रकात पान क्र.८९४ अ.क्र.ड वर र.रू.१,१८,००,०००/- तरतुद नमूद करणेत आलेली आहे. निविदा अटी व शर्ती (A)क्र. ३ नुसार मा.स्थायी समितीने ठरावातनमूद केलेला १ वर्षे कालावधीची मुदत दिनांक ०३/०७/२०२० रोजी पुर्ण होत आहे.वर नमूद केलेनुसार ठेकेदार मे.मेट्रो वेस्ट हॅन्डलिंग प्रा. लि. यांसपिंपरी चिंचवड महानगरपालिका ड क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील मलनिःसारण नलिकामॅनहोल चेंबर्सची सफाई आधुनिक यांत्रिकी पद्धतीने करणे (सक्शन, जेटींग सह रिसायकलिंग मशिनच्या सहाय्याने) या कामास दिनांक ०४/०७/२०२० पासून०३/०७/२०२१ पर्यंत द्वितीय वर्षासाठी मुदतवाढ मिळणेस व या कालावधीसाठी र.रू.१,२९,११,७००/- (अक्षरी र.रू.एक कोटी एकोणतीस लाख अकरा हजार सातशे फक्त) च्या खर्चास व भाववाढ फरक देणेसह मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२९० विषय क्रमांक – २०

दिनांक – १२/०८/२०२० विभाग– ग क्षेत्रिय, जलनि:सारण

सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.गक्षेका/जनि/कावि/७१६/२०२०, दि.२०/०७/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ग क्षेत्रिय कार्यालय हद्दीतील मलनि:सारण नलिका मॅनहोल चेंबर्सची सफाई आधुनिक पध्दतीने करणे (सक्शन, जेटींग सह रिसायकलिंग मशिनच्या सहाय्याने) या कामास मे.आर्यन पंप्स ॲण्ड एनव्हायरो सोल्युशन प्रा.लि यांना मा.स्थायी समिती

